संफौ.ख.क्र.३२/२०२२
शासन वि. रामप्रसाद
**निशाणी क्र.६१**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.८ यांची जबानी शपथेवर सुरू**

| | |
|---|---|
| माझे नाव | :- ज्ञानेश्वर किशनराव जाधव, |
| माझे वय | :- ३६ वर्षे, |
| व्यवसाय | :- मजुरी, |
| राहणार | :- मानवत, ता. मानवत, जि. परभणी. |

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.८ यांचा सरतपास श्री. पी. एम. लिहीणे सहा. सरकारी अभियोक्ता यांचे मार्फत :–**

घटना ही ०५ वर्षापुर्वी बाबासाहेब आंबेडकर पुतळयाजवळ मानवत येथे सायंकाळी ५.३० ते ६.०० च्या दरम्यान घडली होती. त्यादिवशी घटनास्थळी माझा चुलत भाऊ सखाराम सोपान जाधव यांचा अपघात झाला होता. त्यानंतर त्यांनी सरकारी दवाखाना, मानवत येथे नेले होते. त्यानंतर त्यांना दगडु हॉस्पीटल, मानवत व तेथून परभणीला दवाखान्यात नेले होते. तिथे ते मयत झाले. त्यांना मोटारसायकलने धडक दिली होती.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. वाय. ए. पंडीत यांच्यामार्फत सुरू :–**

२) मी पोलीसांना बयान देतेवेळी मयत हे माझे चुलत भाऊ असल्याचे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्यावेळी घटनास्थळी दोन गतिअवरोधक होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी वळण रस्ता असल्याने वाहनांचा वेग कमी असतो. हे म्हणणे खरे नाही की, मी घ्झटना प्रत्यक्ष पाहिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मयत हे पाय घसरून पडले व त्यांच्या डोक्याला मार लागला व ते मयत झाले. हे म्हणणे खरे आहे की, परभणी येथे केस दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटना घडली नव्हती. घटनेच्या वेळी साधारण २० लोक जमा झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी

सं.फौ.ख.क्र.३२/२०२२
शासन वि. रामप्रसाद
**निशाणी क्र.६१**

साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

फेरतपास नाही.

श्रृ. नि. स्वि.,

स्वाक्षरीत/-

ठिकाण : मानवत
दिनांक: ०९/०४/२०२६

**(श्रीमती पी. सी. फटाले)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मानवत.